# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३

## (सकाळी ११.०० ते ११.४५ वाजता)

**(बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु) —**

**"मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठीचा प्रस्ताव"**

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**महिला व बालविकास मंत्री** : **"अठरा वर्षावरील अनाथांना लागू असलेल्या आरक्षण पध्दतीत सुधारणा करण्याबाबत"** या विषयावरील श्री.श्रीकांत भारतीय व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५५८ वरील चर्चेच्या वेळी दिनांक २७ डिसेंबर,२०२२ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**चार : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (४)] —**

(१) **सर्वश्री प्रसाद लाड**, प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरण महापालिका आणि एमएमआरडीएने करण्याचे

असुधारित प्रत

ठरविले असले तरी गेल्या १७ वर्षापासून मिठी नदी गोड होणाच्या प्रतिक्षेत असून यावर १३०० कोटी रुपये खर्च करूनही मिठीचे सौंदर्यीकरण पूर्ण झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या व्यतिरिक्त आणखी १ हजार कोटी विविध कामांसाठी खर्च केले जाणार असून या दोन्ही प्राधिकरणांनी मिठीसाठी बहुतांश कामे केली असली तरी प्रत्यक्षात मात्र प्रदूषणापासून मिठी नदीला मुक्ती मिळाली नसणे, प्रत्यक्षात जी कामे होती ती झालीच नसल्याने यामध्ये सर्विस रोड, नालेसफाई, सुशोभीकरणाचा समावेश असणे, सदर कामाकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहराला पावसाळ्यात पुरापासून वाचविण्यासाठी मिठी नदीच्या पुर्नजिवीतेचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२)** **श्री.अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे अंतर्गत अनुसूचित जातीतील मुलांना संशोधनाचे प्रशिक्षण देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आगामी ५ वर्षासाठी ९० हजार विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम मंजूर करण्यात आलेले असणे, उक्त शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या ३० प्रशिक्षण संस्थांद्वारे प्रशिक्षण देण्याचे काम सुरु असताना त्यांना डावलून अधिकाऱ्यांचे हितसंबंध असलेल्या नविन संस्थांची निवड करण्यासाठी नियमबाह्यरित्या निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असणे, अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्ह्यातील तीन अपात्र असलेल्या संस्थांनी बनावट कागदपत्रे, अशैक्षणिक शिक्षकेत्तर कर्मचारी, बोगस विद्यार्थी याद्या व बनावट देयके सादर करुनही सचिव, सामाजिक न्याय विभाग, तत्कालीन महासंचालक, बार्टी, येथील निविदा गुणांकन समितीतील अधिकारी व योजना विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने अपात्र संस्थांच्या गुणांमध्ये वाढ करुन सदरहू संस्थांना पात्र केल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेनंतर मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी बोगस पध्दतीने काढण्यात आलेली निविदा/ कामाचे आदेश रद्द करण्याचे आदेश दिलेले असणे, तथापि उक्त प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्याने त्यांनी अशाप्रकारे यवतमाळ व पुणे येथील IBPS व MPSC चे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मंजूरी दिलेली असणे, तसेच बार्टी या संस्थेने गत ४ महिन्यांच्या कालावधीत शासन निर्णयाचे उल्लंघन व मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका डावलून सुमारे १२० निविदा प्रक्रिया राबविल्या असणे, उक्त निविदा वारंवार काढून रद्द करुन परत नव्याने निविदा प्रक्रिया राबवित असणे, अशाप्रकारे सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी अवैध संपत्ती जमा केली असणे, त्यामुळे अनुसूचित जातीचे अनेक विद्यार्थी नोकरी व

अग्रिम प्रत

रोजगारापासून वंचित राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, उक्त प्रकरणी व सदरहू निविदा प्रक्रियांची चौकशी करुन अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या संपत्तीची चौकशी करण्यासाठी उच्च स्तरीय समितीची नेमणूक करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोनावडे (ता.फलटण, जि.सातारा) या गावातील कोळसा भट्टीवर काम करणाऱ्या महिला मजूरावर सामुहीक अत्याचार करण्यात आल्याची घटना दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, कोळसा उत्पादन करणाऱ्या भट्टीचा मालक व त्याच्यासह ५ व्यक्तींनी हे कृत्य केल्याचा आरोप पिडीत महिलेने केला असून यासंदर्भातील तक्रार एका सामाजिक संस्थेने पिडीत महिलेसह मांडवी पोलिस स्टेशन येथे नोंदविणे, भट्टीच्या मालकाने पिडीत महिलेच्या मुलांना त्याच्या घरी डांबून ठेवून तिच्या पतीलासुध्दा धमकाविणे, नवऱ्याला व मुलांना जिवे मारण्याची धमकी देऊन या पिडीत महिलेवर अत्याचार करणे, या भट्टीच्या मालकाविरुध्द या पूर्वीसुध्दा बालगुन्हेगारीच्या व अवैध कोळसा जमा केल्याचा गुन्हा नोंदविलेला असणे, याप्रकरणी गुन्हेगारांविरुध्द कडक कारवाई करण्याची व गरीब कातकरी कुटुंबाला कोळसा उत्पादन करणाऱ्या भट्टीच्या मालकांपासून संरक्षण देण्याची होत असलेली मागणी, याप्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(४) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील संजय गांधी योजनेतील अपंग लाभ धारकांच्या मुलाचे वय २५ वर्षे झाल्यावर तसेच त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास त्यांचे अनुदान बंद करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, दिनदुबळ्या शरीराने कमकुवत असणाऱ्या ज्यांना कामधंदा करता येत नाही, अशा अपंगांना जगणे अतिशय अवघड झालेले असणे, यामुळे त्यांना अर्थसहाय्य देण्याची नितांत आवश्यकता असणे, कायद्यानुसार अपंगांना शासकीय नोकऱ्या दिल्या असत्या तर आज एकही अपंग बेरोजगार व निराधार दिसला नसता व त्यांच्यावर भीक मागण्याची वेळ आली नसती, याकरीता अपंगांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्यास कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी त्यांच्या मुलाच्या वयाची तसेच वार्षिक उत्पन्नाची अट रद्द करण्यात यावी, यासाठी मागील पाच वर्षापासून

लाभधारकांनी सर्व संबंधित मंत्री व अधिकारी यांचेकडे वारंवार निवेदने दिली असणे, तसेच मोर्चे काढले असणे, उपोषण केले असणे, तरीसुध्दा शासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे दिनांक ११ जून, २०२३ रोजी तपोवन मैदान, कोल्हापूर येथे शंखध्वनी व ठिय्या आंदोलन करण्यात येणे, सबब शासनाने अपंगाच्या मुलांच्या वयाची तसेच उत्पन्नाची अट रद्द करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करातून आणि पाणी पट्टीतून शाळा, महाविद्यालयांसह सर्व प्रकारच्या शिक्षण संस्था वगळण्यासाठी महापालिका प्रशासनास आदेश देण्याची आवश्यकता असणे, शासनाने यु डायस क्रमांक दिलेल्या मुंबई शहर व उपनगरातील प्रामुख्याने झोपडपट्टीतील महापालिका प्रशासनाने अनधिकृत ठरवलेल्या २६९ खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील दंडात्मक कारवाई त्वरीत रद्द करून त्यांना अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्याची आवश्यकता असणे, नामांकित व प्रयोगशील शिक्षण संस्थांना महानगरपालिकेच्या इमारती नाममात्र भाडयाने (लीजवर) उपलब्ध करण्याची गरज असणे, खाजगी अनुदानित आणि विनाअनुदानित प्राथमिक शाळांतील तसेच यु डायस क्रमांक मिळालेल्या तथापि मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत ठरविलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना भेदभाव न करता सरसकट सर्वांना शालेयपयोगी २७ वस्तू मोफत देण्याची आवश्यकता असणे, क्रिसेंट हायस्कूल, पायलीपाडा, ट्रॉम्बे आणि निर्मल विद्यालय, वडाळा, मुंबई अशा झोपडपट्टीतील अपघातग्रस्त व क्षतीग्रस्त शाळांना महानगरपालिकेच्या शाळेत अत्यंत तातडीने पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मुंबई मनपा क्षेत्रातील १०४ शाळांना मुंबई मनपाने १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करण्याची गरज असणे, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही."

(६) **सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (एमडब्ल्यूआरआरए) राज्यात घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत केलेली वाढ दिनांक १ जुलै, २०२२ पासून लागू करण्यात आली असणे, त्यानुसार कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ३३० रुपये मोजावे लागणार असणे, डिस्टलरी कडील अल्कोहल व इथेनॉल उत्पादनाकरिता होणारा पाणीवापर हा कच्चा माल गृहीत धरुन सुधारित दराने पाणी बिलाची आकारणी होणार असणे, सन २०१८ च्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर

होत असणे, उद्योगात शितपेये, आसवानी (ब्रुअरिज) मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग यांचा समावेश असल्याने डिस्टलरी करिता रेग्युलर दराने पाणी पट्टी आकारण्यात येत असणे, पण शासनाच्या सन २०२२ च्या परिपत्रकामध्ये बाटलीबंद पिण्याचे पाणी, शितपेये, स्पिरीट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरिज, आसवानींना (डिस्टलरीज) व तत्सम उद्योगांचा पाण्याचा कच्चा माल म्हणुन वापर होणाऱ्या उद्योगात समावेश केलेला असणे, त्यामुळे डिस्टलरी करिता प्रति हजार लिटरमागे रु. ११.५२ वरुन रु. ३३० दरवाढ झालेली असणे, सदरची दरवाढ डिस्टलरी उद्योगास परवडणारी नसल्याने त्याचा डिस्टलरी उद्योगावर विपरित परिणाम होऊन उत्पादन निर्मितीला फटका बसणे, त्यामुळे डिस्टलरी उद्योगात पाण्याचा वापर हा थेट कच्च्या मालासाठी होत नसून तो प्रक्रियेसाठी होत असल्याने म्हणजेच औद्योगिक कारणासाठी होत असल्याने डिस्टलरी युनिटसाठी औद्योगिक पाणीवापर दरानुसार पाणीपट्टी आकारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(७) **श्री.अमोल मिटकरी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला जिल्ह्यातील २३६७ शेतकऱ्यांचे ११२ सहकार सोसायटी व जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांचे संमतीपत्र न घेता परस्पर पुनर्गठन करण्यात आल्याचे आढळून येणे, त्यामुळे नवीन कर्ज मिळण्याप्रकरणी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यानुसार संबंधित सर्व शेतकऱ्यांची मिळून १३.६४ कोटी थकीत कर्जे शेतकरी लाभापासून वंचित राहिल्यामुळे थकीत कर्जास माफी मिळणेसाठी मागणी केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी केलेल्या चौकशीअंती उघडकीस आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे संबंधित ११२ सहकारी सोसायट्या तात्काळ बरखास्त करुन या सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द तसेच अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक व्यवस्थापनाविरुध्द पोलिसात गुन्हे दाखल करण्याची शेतकरी वर्गाकडून तसेच काही राजकीय पक्ष कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेली मागणी, परिणामी पर्यायाने शासनाची व जनतेची करण्यात आलेली फसवणूक, यामुळे सदर रक्कमेची कर्जे माफ करण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात येणे, त्यामुळे संबंधित सहकारी सोसायट्या बरखास्त करुन त्यावर प्रशासकीय मंडळे स्थापन केल्यास, तरुणवर्गाला नोकरीची संधी मिळण्याची शक्यता लक्षात घेता त्याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भुमिका."

अग्रप्रत

**(८)** **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातर्फे जे कामगार मंडळाचे सदस्य आहेत अशा कामगारांसाठी मध्यान्ह भोजन देण्याचा निर्णय घेण्यात येणे, या कामगारांना शासनातर्फे मोफत पोटभर भोजन देण्याची व्यवस्था असून कामगारांना मोफत भोजन देण्यात येत असणे, या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून ज्या कामगारांनी नोंदणी केलेली आहे अशा कामगारांना दोन्ही वेळेचे मोफत भोजन न देता काही ठिकाणी ऊसतोड कामगाराचे बनावट नावे देऊन केलेला भ्रष्टाचार, जळगाव जिल्हयात या योजनेचे तब्बल ४७,००० बोगस लाभार्थी दाखवून होत असलेला कोट्यवधीचा गैरव्यवहार, एकटया जळगांव जिल्हयात सप्टेंबर, २०२२ ते एप्रिल, २०२३ दरम्यान ५४ कोटीची बोगस बिले काढणे, जळगाव व शहर परिसरातील गावांमध्ये या योजनेस कामगारांची बनावट यादी देण्यासाठी काही राजकीय पक्षांशी संबंधित कार्यकर्ते या कार्यक्रमात बोगस बनावट कामगारांची नोंदणी करीत असून राज्यातील हा सर्वात मोठा घोटाळा असल्यामुळे या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबतची यादी पुरविणारे एजंट सक्रीय असणे, जळगाव जिल्हयात या योजनेसाठी सरसकट मतदार यादीच जोडण्यात येणे, जेवणाच्या यादीत अनेक प्रतिष्ठीत व मयत लोकांची यादी जोडणे, भुसावळ रस्त्यावरील गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेल्या एका बांधकाम साईटवर दिडशेपेक्षा जास्त कामगारांना जेवण दिल्याचा दावा करण्यात येत असणे, दिननगर येथील औष्णिक वीज केंद्रात दररोज २००० कामगारांना दोन्ही वेळेचे जेवण दिल्याचे दाखवून बोगस बिले काढणे, २५९ दिवसात एकही कामगार गैरहजर नसल्याचे दाखविणे, प्रत्यक्षात फक्त ३८ डबे पुरविण्याचे सिध्द होणे, परंतु येथील सर्व मजूर घरुन स्वत:चे भोजन सोबत आणत असून ते या योजनेचा लाभ घेत नसल्याची बाब उघडकीस आलेली असणे, राज्यात या योजनेत कोट्यवधीचा गैरव्यवहार होत असल्याची शक्यता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

**(९)** **ॲड.अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वांद्रे (पूर्व ) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्यापी रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प धोरणात्मक निर्णयासाठी रखडलेला असणे,

परिणामी स्थानिक रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, पुनर्विकास प्रकल्पांतर्गत क आणि ड वर्ग कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या २००० घरांचे बांधकाम संथगतीने सुरू असणे, धोकादायक स्थितीमधील इमारतींमधील कर्मचाऱ्यांचे ३ महिन्यांमध्ये अन्यत्र स्थलांतरण करण्याचे आदेश दिनांक २ मार्च २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी दिलेले असणे, परंतु सदर प्रक्रियादेखील संथगतीने सुरू असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षांचेच असल्याने सद्यस्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीचा काही भाग कोसळलेला, तर काही छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, वारंवार बैठका घेण्याचे आश्वासित करून देखील बैठका न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरवस्था व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुनर्विकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(१०) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री रामदास आंबटकर, विलास पोतनीस, सुनिल शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ओबीसी विभागांतर्गत केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या अनेक प्रकारच्या योजना विद्यार्थ्यांकरिता सुरू असताना तशा प्रकारच्या योजना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अधिक फायद्याच्या ठरत असल्यामुळे दुसरीकडे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारा लाभ त्या तुलनेमध्ये कमी प्रमाणात असून ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राज्यात कुठल्याही शिक्षण संस्थेमध्ये शिकत असताना त्या ठिकाणी राहण्याकरिता व्यावसायिक अभ्यासक्रम अथवा पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला जाणे, राज्य शासनाच्या वतीने मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणे, तसेच ज्या तालुक्यामध्ये अथवा जिल्ह्यामध्ये तशा पध्दतीची

अग्रिम प्रत

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये मोफत राहण्याची व्यवस्था न झाल्यास बार्टीच्या माध्यमातून स्वाधार योजनेंतर्गत वसतिगृहाच्या व्यतिरिक्त इतरत्र राहण्याकरिता तेव्हा त्यांच्या त्या विद्यार्थ्यांना वसतिगृह भत्ता दिला जातो, परंतु ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राज्य शासनाने गेल्या तीन वर्षापासून प्रत्येक जिल्हयामध्ये ७२ वसतिगृहाची घोषणा केल्यावर सुध्दा प्रत्यक्षात राज्याच्या वतीने या वसतिगृहाची प्रत्यक्षात उभारणी न करणे, अथवा भाड्याने इमारत घेऊन हे वसतिगृह सुरू करण्यात आले नसणे, माहे मार्च २०२३ च्या अधिवेशनामध्ये आणि अनेक सार्वजनिक सभेमध्ये संबंधित मंत्री महोदयांनी सत्र २०२३-२४ पासून विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी या ७२ वसतिगृहाची सोय करून देण्याचे आश्वासन देऊन सुध्दा अद्याप कुठल्याही प्रकारच्या वसतिगृहाची तयारी शासनाच्या वतीने करण्यात आली नसणे, सत्र २०२३-२४ च्या सर्व वसतिगृहामार्फत पारंपारिक अथवा व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून अद्यापही शासनाच्या वतीने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची तयारी करण्यात आली नसणे, हे अन्यायकारक असणे, त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, या संदर्भात शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला असणे, परंतु प्रत्यक्षात त्याची सुध्दा अंमलबजावणी करण्यात आली नसणे, परंतु व्यावसायिक अभ्यासक्रमाशिवाय पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश मिळण्याकरिता संबंधित शासन निर्णयामध्ये उल्लेख नसल्याने तसा शासन निर्णयामध्ये बदल करणे आवश्यक असणे, तसेच बार्टीच्या माध्यमातून स्वाधार योजना राबविल्या जाते, त्याच धर्तीवर वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळणाऱ्या आणि स्वतः इतरत्र राहण्याची सोय करणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना दर महिन्याला वसतिगृह भत्ता महाज्योतितर्फे तात्काळ प्रभावाने लागू करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयके —**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

(१) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ८ — एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर विधेयक, २०२३"

अग्रिम प्रत

(२) "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ९ – डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२३"

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२३

---

आठ : (क) **सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, जयंत पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, कपिल पाटील, किशोर दराडे, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे, राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता असणे, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प

अप्रकाशित प्रत

निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना-नांदेड महामार्गाचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड- लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्याना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड- औरंगाबाद- परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली 'दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, राज्यात वाढलेला वीज दर, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या व अंगणवाडी सेविकांचा पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून

अप्रकाशित

त्यांना पगारही न मिळणे, शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्याच्या शिक्षणाचा दर्जा खालावला असणे, राज्यात कोयता गँगची वाढलेली दहशत, सोशल मिडीयावर लोकांना धमक्या देण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा मध्यम वर्गाला होणारा त्रास, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, बार्टी, महाज्योती व सारथी विभागाच्या गलथान कारभारांमुळे लाखो विद्यार्थी प्रशिक्षणा पासून वंचित रहाणे पर्यायाने त्यांचे शैक्षणिक व रोजगार संदर्भात नुकसान होणे, ग्रामपंचायत व जिल्हापरिषदेच्या निवडणूका घेण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या थकीत मागण्या, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे ४० हजार कोटी येणे बाकी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या कामाचे अद्यापही पैसे न मिळणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, राज्य सरकारने पुरवणी मागणी व अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विविध खात्यामध्ये जाहीर केलेली तरतूद तथापि प्रत्यक्षात निधी मिळण्यास होत असलेला विलंब, त्याची पुर्तता करण्यास आलेले अपयश, विविध विकासकामांना मंजूरी तथापि निधी अभावी कामे प्रलंबित असणे, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ व बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री विक्रम काळे,** प्रविण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, निलय नाईक, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** –

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा,

अग्रिम प्रत

यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती – समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची" स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन–२०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे,

महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक  व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला

अग्रिम प्रत

अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) सर्वश्री शशिकांत शिंदे,** एकनाथराव खडसे, अब्दुल्लाखान दुर्राणी, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात शहरांसह ग्रामीण भागात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कामे करण्यात आलेली असणे, तथापि ठेकेदारांची सुमारे १३ कोटी रुपयांची देयके शासनाकडून अद्याप अदा करण्यात आलेली नसणे, तसेच सन २०२३-२४ या वर्षासाठी ४० हजार कोटी रुपयांची कामे प्रस्तावित असून ठेकेदारांची मागील देयके थकीत असल्याने ठेकेदार संघटनेने, सार्वजनिक बांधकाम विभाग व दोन्ही ग्रामसडक योजनेच्या कार्यालयांसमोर साखळी उपोषण करण्याचा शासनास इशारा दिला असून याचा विकासकामांवर विपरित परिणाम होत असल्याने, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, आमश्या पाडवी, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"सद्य:स्थितीत वेगवेगळ्या प्रकारच्या साथीच्या आजारांनी मुंबईकरांसह राज्यातील जनता हैराण झाली असताना, त्यांच्या वैद्यकीय असहायतेचा गैरफायदा घेत मुंबईसह राज्यातील अनेक खाजगी पॅथॉलॉजी लॅबमधून रुग्णांची तपासण्यांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असलेली लुट, आरोग्य विभागाने डेंग्यूच्या तपासणीसाठी सहाशे रुपये व स्वाईन फ्ल्यूच्या तपासणीसाठी साडेतीन ते पाच हजार रुपयांची दर मर्यादा निश्चित केली असतानाही राज्यातील खाजगी पॅथॉलॉजी लॅबकडून मनमानी पद्धतीने रुग्णांकडून पैसे घेण्यात येणे, डेंग्यू व स्वाईन फ्ल्यू यांसारख्या आजारांची लागण झाल्याचे कळताच रुग्ण व त्यांचे नातेवाईक धास्तावत असल्याने खाजगी पॅथॉलॉजी लॅबकडून त्यांची करण्यात येत असलेली पिळवणूक, रक्त नमुने बरेच असल्यामुळे रुग्णांना तातडीने रक्त तपासणीचा अहवाल मिळण्याकरिता खाजगी पॅथॉलॉजी लॅबकडून अतिरिक्त पैसे आकारण्यात येणे. घरी रक्त तपासून देण्याच्या सुविधेकरिता पॅथॉलॉजी लॅबकडून दुप्पट आकारणी केली जाणे, खाजगी पॅथॉलॉजी लॅबकडून होत असलेली रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाने या तपासण्यांसाठी प्रत्येकी ६०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क न आकारण्याचे दिलेले निर्देश, परंतु खाजगी पॅथॉलॉजी

अस्सुधारित प्रत

लॅबकडून सदरहू निर्देशांचे सर्रास होत असलेले उल्लंघन, डेंग्यूची तपासणी वगळता अन्य तपासण्यांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसणे, खाजगी पॅथॉलॉजी लॅबचा आरोग्य तपासणीचा दिवसेदिवस वाढत चाललेला गैरप्रकार रोखण्याबाबत तसेच खाजगी पॅथॉलॉजी लॅबच्या दरावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १९ जुलै , २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अग्रधारित प्रत